## अटी व शर्ती

सदरील सदर निविदा धारकाने निविदा फी व अमानत रक्कम (निविदा फी ५००/- रु. व अमानत रक्कम ३०००/- रु.) ऑनलाइन द्वारे भरल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र ( as a part of e - tendering document and process) संबंधित Net Banking ची UTR नंबर असलेली पावती निविदा भरतानी लिफाफा क्रमांक ०१ मध्ये अपलोड करावी. कोणत्याही प्रकारच्या मोहरबंद निविदा स्वीकारल्या जाणार नाही निविदेची सर्व कार्यवाही ऑनलाइनने पूर्ण होईल.

१) लिफाफा क्रमांक १ मध्ये द्यावयाची कागजपत्रे खालील प्रमाणे आहे.

१) निविदा फीस व अमानत रकमेचा ऑनलाइन भरणा केल्याची पावती.

२) नवीन शासकीय नियमानुसार GST नोंदणी प्रमाणपत्र

३) आयकर प्रमाणपत्र अद्यावत

४) पेन कार्ड.(PAN)

३) लिफाफा क्रमांक २ मध्ये फक्त दरपत्रक असावा.

४) दरपत्रक मंजूर झाल्यास रु. १००/- च्या स्टंपपेपर वर साहित्य पुरवठादारास ग्रामपंचायतनी ठरविलेल्या कालावधी मध्ये मान्य झालेल्या दरपत्रकानुसार साहित्य पुरवठा करण्यास तयार बाबाबतचे करारनामा लिहून द्यावे लागेल.

५) दरपत्रक रद्द किंवा नामंजूर करण्याचे सर्व अधिकार ग्रामपंचायत बुराडीटोला कडे राखून ठेवण्यात आलेले आहे.तसेच ई निविदा भरणाऱ्या व्यक्तीस या संस्थे द्वारे ई निविदा नाकारण्याचे स्पष्टीकरण मागता येणार नाही.

६) साहित्याच्या किमती मध्ये वाढ किंवा घट झाल्यास सदर किमतीचा पारित निविदा रकमेमध्ये बदल करता येणार नाही. साहित्य पुरवठाधारकाचा ज्या किमतीनुसार दरपत्रक स्वीकारण्यात आलेला आहे तोच दरपत्रक संपूर्ण आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता मान्य राहील व त्या मध्ये कोणत्याच प्रकारे बदल करता येणार नाही.

७) साहित्य पुरवठा करण्याचा कालावधी आदेश मिळाल्या नंतर ३१ मार्च २०२७ पर्यंत वैध राहील व त्यानंतर सदर करार आपोआप संपुष्टात येईल.तरी ग्रामपंचायत आपल्या सोयीनुसार सदर निविदेला मुद्दतवाढ देण्यास स्वतंत्र आहे.

८) पुरवठादार कडून काही अडचण आल्यास कोणत्याही वेळेवर करार रद्द करण्याचे सर्व अधिकार ग्रामपंचायत बुराडीटोलाकडे सुरक्षित राखून ठेवण्यात आलेले आहे व त्याबद्दलचे कोणतेही स्पष्टीकरण या संस्थे तर्फे देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. कोणतेही कारण न दर्शविता कोणतेही एखादे अथवा सर्व निविदा मधील एखादी बाब फेटाळण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्यास राखून ठेवला आहे.

९) साहित्य पुरवठाधारकाला पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्याचे प्रमाणात रायल्टी सादर करावी लागेल. व दर त्याचप्रमाणे दरपत्रकामध्ये समाविष्ट असावे.पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्याचा प्रमाणात रायल्टी सादर न केल्यास देयकातून शासकीय नियमानुसार रायल्टीची रक्कम कपात करून देयक अदा करण्यात येईल.

१०) साहित्य पुरविल्याबाबत प्रथम पोच पावती सादर करावी लागेल.व पुरविलेल्या साहित्याची मात्रा तपासल्यानंतर, योग्य आढल्यास पोच पावती देण्यात येईल.

११) पुरविण्यात येणारे साहित्य शासकीय मापदंडा प्रमाणे असणे बंधनकारक असून येणाऱ्या साहित्याची गुणवत्ता चाचणी अहवाल सादर करणे आवश्यक राहील तसे नसल्यास आपला पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल.

१२) उपरोक्त साहित्य ग्रामपंचायतचे क्षेत्रातील कामाचे स्थळी ग्रामपंचायत च्या मागणीनुसार पोहचते करावे लागेल व त्याच प्रमाणे दरपत्रकात दर नमुद करावा.

१३) निधी व अनुदान यांच्या उपलब्धतेनुसार देयके अदा करण्यात येईल, व कोणत्याही प्रकारची अग्रिम रक्कम पुरवठादाराला देता येणार नाही.

१४) सर्व देयकांची अदायगी रेखांकित धनादेश / PFMS प्रणाली द्वारे करण्यात येईल.

| सरपंच | उपसरपंच | ग्रामपंचायत अधिकारी |
|---|---|---|
| ग्रामपंचायत बुराडीटोला | ग्रामपंचायत बुराडीटोला | ग्रामपंचायत बुराडीटोला |

Signature Not Verified
Digitally signed by Sandhya Tikaram Bhajipale
Date: 2026.05.18 16:56:52 IST
Location: Maharashtra-MH